**ठळक बातम्या**

- राज्य घटनेतून मिळालेल्या जबाबदारीतूनच मतदार याद्यांचं पुनरीक्षण सुरू, केवळ बदनामी करण्यासाठी विरोधकांकडून आरोप होत असल्याचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा लोकसभेत दावा

- लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना योग्य वेळी २१०० रुपये देण्याचं राज्य सरकारचं आश्वासन, हजारो बोगस लाभार्थ्यांवर कारवाई सुरु

- पुण्यातल्या जमीन घोटाळ्यात पार्थ पवार यांना वाचवण्याचा प्रयत्न पोलिसांचा प्रयत्न आहे का असा मुंबई उच्च न्यायालयाचा सवाल

- चांदीच्या दराचा नवा विक्रम, किलोमागे साडे ६ हजार रुपयांची वाढ नोंदवत १ लाख ९१ हजारांच्या वर

**आणि**

- युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत दिवाळीचा समावेश

**<><><><><>**

राज्य घटनेनं सोपवलेल्या जबाबदारीतूनच निवडणूक आयोगानं मतदार याद्यांच्या पुनरीक्षणाचं काम हाती घेतलं आहे. मतदार यादी शुद्ध करण्याची ही प्रक्रीया आहे असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकसभेत केलं. सरकारची आणि निवडणूक आयोगाची बदनामी करण्यासाठी विरोधक आरोप करत असल्याचं ते म्हणाले. निवडणूक सुधारणांवरुन सुरू असलेल्या चर्चेदरम्यान ते लोकसभेत बोलत होते

**होल्ड - अमित शहा बाइट (२२सेकंद)**

देशात १९५२ मध्ये पहिल्यांदा ही प्रक्रीया राबवली गेली.२००४ पर्यंत कुठल्याही पक्षानं या प्रक्रियेला विरोध केला नाही, असं ते यावेळी म्हणाले.

**होल्ड - अमित शहा बाइट २( ४३सेकंद)**

निवडणूक आयोग सरकारच्या अखत्यारीत काम करत नसल्याचंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा मूलभूत अधिकार असून निवडणूक आयोग पक्षपातीपणा करत असल्याची टीका काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल यांनी चर्चेदरम्यान केली. निवडणूक आयोगानं निष्पक्ष पद्धतीनं काम करायला हवं, असं मत शिरोमणी अकाली दलाच्या हरसिमरत कौर बादल यांनी मांडलं. विशेष सखोल पुनरीक्षण म्हणजे धर्माच्या आधारे मतदारांची नावं काढून टाकायचा प्रयत्न आहे, असा आरोप एआयएमआयएमचे असदुद्दीन ओवेसी यांनी केला.

**<><><><><>**

भारतातले रेल्वे तिकीटाचे दर शेजारी देशांपेक्षा परवडणारे आहेत, हे दर परवडणारे राहावेत यासाठी ६० हजार कोटी रुपयांचं अनुदान दिल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत सांगितलं. ज्येष्ठ नागरिकांना कोरोनापूर्वीचे तिकीट दर लागू केले जातील का या प्रश्नाचं उत्तर देताना ते बोलत होते. भारतातले रेल्वे तिकीटाचे दर विकसित देशांपेक्षा पाच ते दहा टक्के कमी आहेत, असं वैष्णव म्हणाले. एकट्याने प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी मेरी सहेली उपक्रम सुरू करण्यात आला, रेल्वे डबे आणि स्थानकांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले, तसंच महिलांच्या डब्यात प्रवेश करणाऱ्या पुरुषावर कठोर कारवाई केली जात असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जुन्या चित्रपटांचं जतन आणि डिजिटायजेशन करण्यासाठी सरकार राष्ट्रीय चित्रपट वारसा अभियान राबवत आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल मुरुगन

यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. या अभियानांतर्गत आतापर्यंत १ हजार ४६९ चित्रपटांचं डिजिटायजेशन केलं आहे. डिजिटाईज आणि रीस्टोअर केलेल्या चित्रपटांची देखभाल राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय करत असून त्यांच्या वेबसाईटवर हे चित्रपट उपलब्ध आहेत, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना २१०० रुपयांचा हप्ता योग्य वेळी देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. लाडकी बहीण योजनेसाठी २ कोटी ४३ लाख ८२ हजार ९३६ अर्ज विभागाने पात्रतेनुसार ग्राह्य धरले आहेत, अशी माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. आत्तापर्यंत १ कोटी ७४ लाखांहून अधिक महिलांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे, असंही त्यांनी सांगितलं. राज्यातल्या १२ ते १४ हजार महिलांच्या नावावर पुरुषांची बँक खाती जोडलेली असल्याचं पडताळणीत आढळलं असून अशा प्रकरणांचा सखोल तपास करून कुठलीही पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाही, याची खात्री केल्याचं तटकरे म्हणाल्या. तसंच ८ हजार शासकीय कर्मचाऱ्यांनी अपात्र असतानाही घेतलेल्या रकमेची वसुली गेल्या ५ ते ६ महिन्यांपासून सुरू असून पुढच्या दोन महिन्यांत ती पूर्ण होईल, असंही त्या म्हणाल्या. वाढती वाहनसंख्या तसंच ई - चलानच्या यंत्रणेत बदल करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानपरिषदेत ही घोषणा केली. ई चलानची वसुली करण्यासाठी लोकअदालत सारखा उपक्रम राबवण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

पुण्यातल्या जमीन गैरव्यवहार प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांचं नाव एफआयआरमधे न नोंदवता इतर व्यक्तींची चौकशी करत पोलीस पार्थ पवार यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत का, असा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने विचारला आहे. या प्रकरणातील आरोपी शीतल तेजवानी यांनी दाखल केलेल्या जामीन अर्जावरील सुनावणी न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकल पीठासमोर झाली, त्यावेळी न्यायालयानं हा प्रश्न विचारला. यावर पोलीस कायद्यानुसार आवश्यक कारवाई करतील, असं सरकारी वकील मानकुंवर देशमुख यांनी न्यायालयाला सांगितलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना वार्ताहरांनी याबद्दल विचारलं असता तपास करून न्यायालयात योग्य उत्तर दाखल करण्यात येईल, असं सांगितलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री**

**<><><><><>**

देशात चांदीच्या दरांनी आज नवी उच्चांकी पातळी गाठली. कालच्या तुलनेत साडे ६ हजार रुपयांनी चांदी महाग झाली आणि मुंबईच्या बाजारपेठेत एक किलो चांदीसाठी १ लाख ९१ हजार रुपये मोजावे लागत होते. काल १ किलो चांदी १ लाख ८४ हजार रुपये दराने मिळत होती. सोन्याच्या दरात मात्र फारशी वाढ झाली नाही. एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ३१ हजार रुपये मोजावे लागत होते.

**<><><><><>**

दीपावलीचा सण आता मानवतेचा अमूर्त वारसा बनला आहे. युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत दिवाळीचा समावेश करण्यात आला आहे.  युनेस्कोचं २० वं अधिवेशन नवी दिल्लीच्या लालकिल्ल्यात सुरु आहे. त्यात संबंधित समितीच्या बैठकीनंतर हा निर्णय जाहीर झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह विविध मान्यवरांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. यापूर्वी कुंभमेळा,

रामलीला, दुर्गापूजा, गरबा अशा १५ भारतीय परंपरांचा तसंच पारंपरिक कौशल्यांचा समावेश या यादीत झाला आहे.

**<><><><><>**

इंडिगोची अनेक विमान उड्डाणं रद्द करण्यासाठी कारणीभूत ठरलेली परिस्थिती का निर्माण झाली, असा प्रश्न दिल्ली उच्च न्यायालयाने आज केंद्र सरकारला विचारला. देशभरातल्या विमानतळांवर लाखो प्रवासी अडकून असताना अशी परिस्थिती कशी निर्माण होऊ दिली गेली. अडकलेल्या प्रवाशांना झालेला त्रास आणि छळवणूक याखेरीज देशाच्या अर्थव्यवस्थेला झालेल्या नुकसानाचा हा प्रश्न असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले. इतर विमान कंपन्या या संकटाच्या परिस्थितीत प्रवाशांकडून जादा रक्कम उकळून त्यांचा गैरफायदा कसा घेऊ शकतात, असा प्रश्नही मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या पीठाने विचारला. दरम्यान, डीजीसीए अर्थात नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांना संपूर्ण माहितीसह उद्या आपल्या कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेत जाण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांच्या H-1B व्हिजाच्या मुलाखती काही महिन्यांसाठी पुढे ढकलल्या गेल्या आहेत. अर्जदारांच्या समाजमाध्यमा वरच्या नोंदी आणि ऑनलाईन व्यवहार यांचं परिनिरीक्षण करण्यासाठी वेळ लागत असल्यानं अमेरिकेच्या वकिलातीने संबंधित अर्जदारांना इमेल द्वारा वेळापत्रकातला बदल कळवायला सुरुवात केली आहे.

**//<><><><><>//**